ISSN 2231-0789

# SOCIAL SCIENCE REPORTER

An Inter-Disciplinary Peer-Reviewed International Research Journal

Vol 7 ● Issue 1 ● Feb 2017

S.S. Kanade
Editor-in-Chief

Scanned by CamScanner

www.vishwabharati.in ISSN 2231-0789

# SOCIAL SCIENCE REPORTER

A PEER-REVIEWED INTER-DISCIPLINARY INTERNATIONAL RESEARCH JOURNAL

Volume 7 Issue 1 February 2017

## Advisory Board

**S. P. Melkeri:** Professor, Dept of Psychology, Gulbarga University, Gulbarga (Karnataka).

## Editorial Board

**Purushottam Singh:** Asst. Professor, Dept. of History, VSSD College Kanpur (UP).

**R. Gopalaraju:** Associate Professor of Sociology, Maharaja College, University of Mysore, Mysore (Karnataka).

**Aradhana Sharma:** Dept. of Psychology, DAV College, Chandigarh.

**Dhiren Tamuli:** Asst. Professor, Dept. of Political Science, DKD College, Dergaon, Golaghat (Assam).

**Wajahit Hussain:** Asst. Professor, Dept. of English, Government College of Poonch, Jammu & Kashmir (J&K).

**Jayashree S. Reddy:** UGC Post Doctoral Fellow, Dept. of Education, Gulbarga University, Gulbarga (Karnataka).

**Mohan Kumar HS:** Professor, Dept. of Sociology, Maharaja College, University of Mysore, Mysore (Karnataka).

**Dibyajyoti Dutta:** Asst. Professor, Dept. of Political Science, Dibrugarh University, Dibrugarh (Assam).

**Maheshwari S. Kachapur:** Doctoral Fellow, Dept. of Social Work, Gulbarga University, Gulbarga (Karnataka).

**Nithyanandan:** Asst. Professor, Dept. of Psychology, Periyar University, Selam (TN).

## Assistant Editors

**Vijaya Patil:** Asst. Professor, Dept. of Home Science, GFGC,Hassan (Karnataka).

**SBM Prasanna:** Asst. Professor, Dept. of Political Science, University of Mysore, Mysore (Karnataka).

**Rukmini:** Asst. Professor, Dept. of Psychology, GFGC, Vijayanagara, Bangalore (Karnataka).

## Editor-in-Chief

**Chandrakant Jamadar**

Asst. Professor, Post Graduate Studies in Psychology, Maharani Arts & Commerce College for Women, Mysore (Karnataka).

mscbrain@gmail.com

## Principal Advisor

**S. S. KANADE**

drsskanade@gmail.com

Role of Micro Enterprises in Employment Generation in Kumaon Region of Uttarakhand
**Vineeta Mehta**
59 - 67

CEO Equity Compensation and Firm Performance: Evidence from India
**Farha Naz Khan & Neeraj Sehrawat**
68 - 90

**ಹಸ್ತಪ್ರತಿಶಾಸ್ತ್ರಕ್ಕೆ ರೋಣ ತಾಲೂಕಿನ ಪದ್ಮಸಾಲಿ ಸಮಾಜದ ಕೊಡುಗೆ** A Richfull Contribution to Man's Script by the Padmasali Society of Ron
**"ಶ್ರೀ ಶ್ರೀ ಮಾರ್ಕಂಡೇಯ ಪುರಾಣ" – ಸಂಸ್ಕೃತದಲ್ಲಿ ವಿರಚಿತ** Lord Shree Markandey Purana in Sanskrit Script
**Jyoti M. Alawandi**
91 - 98

जिल्हा परिषद, पंचायत समिति, ग्रामसभा आणि ग्रामपंचायत– रचना आणि कार्य
**ठोलिया विरेंद्र कैलासचंद आणि प्रदिप प. छाजेड**
99 - 118

मध्यकाल में भारत का समुद्री व्यापार
**डॉ. गोपाल चौणन**
119 - 127

Impact of Social Movement on Women Education
**Jyoti Kalanrao**
128 - 134

मराठवाड्याच्या शेती विकासामध्ये ना. श्री. सुंदररावजी सोळंके यांचे योगदान
**विष्णू सोनवने**
135 - 138


Scanned by CamScanner

VISHWABHARATI
RESEARCH CENTRE

SOCIAL SCIENCE REPORTER
ISSN 2231-0789
Vol 7. Issue 1. Feb 2017. pp.135-138
http://www.vishwabharati.in
Paper received: 11 Jan 2017.
Paper accepted: 12 Feb 2017.
© VISHWABHARATI Research Centre

# मराठवाड्याच्या शेती विकासामध्ये ना. श्री. सुंदररावजी सोळंके यांचे योगदान

विष्णू सोनवने

**प्रस्तावनाः**

मराठवाडा हा भाग योगी पुरूषांच्या वास्तव्याने पावन झालेला असून त्यासोबतच मोगलांचे अमानुष आक्रमण आणि छळही सोसलेला असा आहे. हैद्राबाद मुक्ती संग्रामाची क्रांती मात्र मराठवाड्यात पहावयास मिळते. प्राचीन काळपासून धान्याचे कोठार म्हणून प्रसिद्ध असलेला हा भाग मध्यंतरीच्या काळात दुर्लक्षित झाला आणि स्थापत्य कृतीच्या विघटनास कारणीभूत ठरलाध ह्या भागामध्ये धार्मिक महत्व मोठ्या प्रमाणात आहे. धाकटी पंढरी असलेल्या नारायणगड संस्थान, औढा नागनाथ, परळी वैजीनाथ व घृष्णेश्वर अशा अनेक धार्मिक ठिकाणी पावन झालेला आहे. तसेच अजिंठा, वेरूळ या जगप्रसिद्ध लेण्यांची भूमी विकसित असली तरी औद्योगिक व अन्य क्षेत्रातील प्रगतीच्या दृष्टीने मागासलेली होती या मराठवाड्यात मतलबी व जातीयवादी यांनी पेटलेल्या मुत्सदी पुरूषांची कारकीर्द होती.

मतलबी लोकांची जाणीवपूर्वक मराठवाड्याचा विकास होऊ दिला नाही. मराठवाड्याच्या विकासाकडे सतत दुर्लक्ष केले. तेव्हा पासून मराठवाडा विकासापासून

**विष्णू सोनवने** : मिलिया महाविद्यालय, बीड

Scanned by CamScanner

वंचीत राहिला १ मे १९६० रोजी महाराष्ट्र खऱ्या अर्थाने स्वतंत्र झाला त्यानंतर नंतरच्या काळामध्ये मराठवाड्याच्या विकासाला दिशा मिळाली. तेव्हापासून मराठवाडा कुठेतरी विकासाच्या दिशेने वावरू लागला. सत्तांतर झाले विकासाला गती मिळाली.

श्री. सुंदरराव सोळंके यांच्या शैक्षणिक काळामध्ये मराठवाड्याची मागासलेली दशा त्यांनी पाहिली होती मराठवाड्याचा विकास व्हावा असे त्यांच्या नेहमी मनामध्ये होते. सन १९६५ साली एल. एल.बी. शिक्षण पूर्ण करून समाजाची सेवा करण्याचा ध्यास घेतला संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीनंतर १९६२ साली कै. यशवंतराव चव्हाण यांनी जिल्हा परिषद स्थापन केली त्या पहिल्या जिल्हा परिषदमध्ये बहुजन चेहरा मा. सुंदररावजी सोळंके यांना अध्यक्षांचा मान मिळाला तेव्हा पासून त्यांनी अनेक विकासाच्या योजना राबविण्यास सुरूवात केली.

कृषीतज्ञ श्री. वसंतराव नाईक यांच्या मंत्रीमंडळात प्रथमच सुंदररावजी सोळंके साहेब यांची वर्णी लागली. ग्रामीण भागाचा विकास करण्यासाठी त्यांच्या मनाने उठाव केला. नव्या उमेदीने, नव्या जोशाने मागासलेल्या मराठवाड्याच्या विकासावर लक्ष केंद्रीत केले. आई तुळजाभवानी यांच्या आर्शिवादाने व जनतेच्या सहकार्याने श्री. सोळंके सुंदररावजी यांना विकासाची दिशा मिळाली मराठवाड्याचा विकास करण्यासाठी त्यांनी कठोर परिश्रम घेतले. त्यांच्या परिश्रमातून आपला मराठवाडा कसा विकसीत होईल हाच ध्यास त्यांनी घेतला.

सन १९७० साली महाराष्ट्राचे महसूल राज्यमंत्री झाले साहेबांनी संधीचे सोने केले संपूर्ण महाराष्ट्रभर त्यांच्या कार्याचा गौरव होवू लागला. मराठवाड्याच्या कानाकोपऱ्यात विकासाची सुरूवात केली. ह.भ.प भगवान बाबा, ह.भ.प. भिमसिंह महाराज यांच्या आशिर्वादाने पुनीत झालेले श्री. सुंदररावजी सोळंके साहेब महाराष्ट्राच्या कॅबीनेट मंत्रीपदी आरूढ झाले.

सन १९७८ साली श्री सुंदररावजी सोळंके साहेब महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री झाले. पुढील काळात त्यांनी माजलगाव तालुक्यात साखर कारखाना सुरू केला. दुग्ध व्यवसायाला चालना दिली, मराठवाडा औद्योगिक विकासात पुढले आणला, औद्योगिक वसाहतीची निर्मिती केली, शेती विकासाला चालना म्हणून जलसिंचन प्रकल्प योजना, औष्णीक विद्यूत केंद्र उभारणी केली, हे सर्व करत असतांना मराठावाड्यातील शेतकऱ्यांच्या कल्याणाकडे सतत लक्षक केंद्रीत केले. मराठवाड्यातील भूमीत अमाप पिक देण्याची क्षमता आहे तेथील शेतकरी सुद्धा कष्ट

Scanned by CamScanner

करणारा आहे. पण पाण्याशिवाय शेतकरी काहीच करू शकत नाही हे त्यांनी जानले अशा सुपीक भूमीसाठी व शेतकऱ्यांच्या विकासासाठी पाटबंधारे योजना आखल्या. माजलगाव सिंचन प्रकल्प, जायकवाडी दुसरा टप्पा सरस्वती प्रकल्प या प्रमुख योजना तर त्यांच्या दुर दृष्टीने आणि योजकोचे शिखर मानले जाते.

**शेती विकासातील ना. सुंदररावजी सोळंके साहेब यांचे योगदानः**

भारत हा कृषीप्रधान देश आहे. भारताची अर्थव्यवस्था ही शेतीवर आधारीत आहे. भारतात ७० टक्के लोकांचा शेती हा व्यवसाय आहे. महाराष्ट्रतील मराठवाडा हा सुद्धा शेतीवर आधारीत आहे. तेथील बहुसंख्य लोक शेती व्यवसाय करतात मराठवाड्यातील अनेक लोकांची उपजिवीका शेतीवरच अवलंबून आहे. म्हणून मराठवाड्यातील बळीराजा सुखी करण्याचा ध्यास मा. श्री. सुंदररावजी सोळंके यांनी घतला मराठवाड्यातील शेतीचा विकास करण्यासाठी अनेक योजना अमलात आणल्याध मराठवाडा हा संपुर्ण पर्जन्यावर आधारीत असणारा शेतीचा भाग जास्तीत जास्त कसा ओलीताखाली करता येईल यांचा प्रयत्न केला त्यासाठी मा. श्री. सुंदररावजी सोळंके साहेबांनी आगोदर जमीनीचे सपाटीकरण केले. नंतरच्या काळात लहान मोठे प्रकल्प योजना राबविल्या.

शेतकऱ्यांना संकरीत जातीची बी–बियाणे लागवडीस उपलब्ध करून दिले. शेतकऱ्यांसाठी मोठ्या प्रमाणात पाणी पुरवठा उपलब्ध करून दिला. हजारो शेतकऱ्यांना विहिरी खांदण्यात आल्या. पाठबंधारे व धरणे बांधून पाणी परवठ्याची सोय केली. माजलगाव प्रकल्प हाती घेतले. जवळपास १०० लहान मोठे प्रकल्प त्यांनी पूर्ण केले. त्यामुळे मराठवाड्यातील लाखो एकर जमीन आलीताखाली आली. त्यामुळे मोठ्या प्रमाणात शेती क्षेत्राचा विकास होऊन उत्पादनात मोठ्या प्रमाणात वाढ झाली. शेतीच्या विकासाबरोबरच मराठवाड्यातील शेतकऱ्यांच्या मुलांना शिक्षण मिळावे म्हणून मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाच्या अनेक शाळा, महाविद्यालये स्थापन केली. शेतीच्या किसासाबरोबरच शिक्षणाची गंगा मराठवाड्यात पसरवली.

शेतीचा विकासा होण्यासाठी शेतीविषयक ज्ञान मिळण्यासाठी कृषीवर आधारीत असतेल्या मराठवाड्यात कृषीतंत्रज्ञानाचा झपाट्याने प्रसार केला. त्यातूनच परभणी येथे कृषी विद्यापीठ स्थापन करून संपूर्ण मराठवाड्याचा कायापाटल झाला शेतकऱ्यांसाठी पिक संरक्षण योजना अमलात आणून दोन लक्ष एकर क्षेत्र या योजनेत आणण्यात आले.

Scanned by CamScanner

एके काळी ओसाड व उजाड वाटणारा मराठवाड्याचा भाग जलसिंचन प्रकल्पामुळे संचनाखाली आला. शेतीला पुरक व्यवसाय म्हणून त्यांना अनेक ठिकाणी दुग्ध प्रकल्प उभारले.

महाराष्ट्र राज्याच्या शेतीच्या उत्पन्नापैकी मराठवाड्यामध्ये उत्पन्न सर्वात जास्त आहे. दि. २० सप्टेंबर १९९० रोजी माजलगाव सहकारी साखरकारखान्याचे भूमिपुजन केले. या सर्व मराठवाड्यातील व माजलगाव तालुक्यातील विकासाचे श्रेय मा. ना. श्री सुंदररावजी आबासाहेब सोळंके साहेब यांना जाते.

**निष्कर्ष :**

शेती हा भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा आहे हे ओळखून ज्याप्रमाणे भगवान शंकराने वेगवान गंगेच्या प्रवाहाला आपल्या जटेत स्थिरावून गंगेला पृथ्वी तलावर आणून जनमाणसाचे जीवन सुखी व समृद्ध केले. त्याच प्रमाणे आमच्या आधुनिक सुंदररावजीने अर्निबंध वाहणाऱ्या नद्यांना आवर घालून विद्युत निर्मीती पूर नियंत्रण व जलसिंचन योजनेद्वारे फार मोठे कोरडवाहू क्षेत्र ओलीताखाली आणून देशाला अन्न-धान्य व वीज निर्मितीबाबत स्वावलंबी बनविले. त्यामुळेच हरीत क्रांती व धवलक्रांती यशस्वी होवू शकली.

**संदर्भ सूची:**

प्रा. रावसाहेब देशमुख,२००६ सुंदररावजी सोळंके आधारावर जीवन कार्य, प्रकाशक शतायुषी प्रकाशन, माजलगाव जि. बीड.

Scanned by CamScanner